| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र. ४९८/२०२२**<br>**नि.५ वरील आदेश**<br>**धनंजय उर्फ प्रज्योत प्रतापगोंडा पाटील वगैरे वि. प्रकाश आपगोंडा पाटील**<br>**सीएनआर नं. MHKO050050162022** |

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दाव्याचा अंतीम निकाल पावेतो प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी वादींचे दावा मिळकतीमधील (अर्ज परिच्छेद १ मध्ये नमुद) शांततामय कब्जे वहिवाटीस व उपभोगास हरकत, अडथळा करु नये व दावा मिळकतींमधील पिकांची नासधूस करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश होवून मिळण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३९ नियम १ व २ तसचे कलम १५१प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन असे की, मौजे चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर गावचे हद्दीतील गट नं. १०५ याचे एकूण क्षेत्र ०हे. २६ आर, आकार ३ रु. २५ पै. ची बागायत शेत जमीन यास चर्तुःसिमा पुर्वेस – श्री . बेनाडे यांची शेत जमीन, पश्चिमेस – रस्ता, दक्षिणेस - वादी नं. १ धनंजय पाटील व श्री. व्हलेर यांची शेत जमीन आणि उत्तरेस - वादी नं. ३ ते ६ यांचे मालकीची दावा मिळकत १ (ब) ची शेत जमीन (यापुढे दावा मिळकत १(अ) असे संबोदण्यात येईल), तसेच गट नं. १०४ याचे एकूण क्षेत्र ०हे. २१ आर, आकार २रु. ८७ पै. ची बागायत शेत जमीन यास चर्तुःसिमा पुर्वेस – श्री. बेनाडे यांची शेत जमीन , पश्चिमेस – रस्ता, दक्षिणेस - वादी नं. १ व २ यांचे मालकीची दावा मिळकत १(ब) ची शेत जमीन आणि उत्तरेस- रमेश आपगोंडा पाटील यांची शेत जमीन (यापुढे दावा मिळकत १(ब) असे संभोदण्यात येईल)

३. दावा मिळकत १(अ) ही वादी नं. १ व २ यांच्या समाईक मालकी असून दावा मिळकत १(ब) ही वादी नं. ३ ते ६ यांच्या समाईक मालकीची आहे. प्रतिवादी नं. १ व २ हे प्रतिवादी नं. ३ यांचे अनुक्रमे वडील - आई आहेत. दावा मिळकत १(अ) ही मुळची बापू बाळू करडे यांचे मालकीची होती . बापू बाळू करडे यांचेकडून सदर मिळकत ही सौ. लक्ष्मीबाई सिदगोंडा पाटील (चिकाम) यांनी नोंद नं. ४६३९, दि. ०४.११.१९९१ रोजी खरेदी घेतली होती . वादी नं. १ व २ तर्फे अ.पा.क. प्रतापगोंडा सिदगोडा पाटील यांनी सदर दावा मिळकत ही सौ . लक्ष्मीबाई सिदगोंडा पाटील (चिकाम) यांचेकडून नोंद नं. २०५१, दि. २२.०५.२००० रोजी खरेदी घेतली होती . अशाप्रमाणे वादी नं. १ व ३ हे दावा मिळकत १(अ) चे कायदेशीर मालक, वहिवाटदार असून ते सदर जमीनीतून ऊस, भुईमुग, गहू इ. पिके घेतात.

४. दावा मिळकत १(ब) ही वादी नं. ३ ते ६ यांचे पुर्वहक्कदार प्रदिप आण्णा पाटील यांनी कलगोंडा बाळगोंडा पाटील , बापूसो कलगोंडा पाटील व भाऊसो कलगोंडा पाटील यांचेकडून दि. १०.०२.२००० रोजी नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी घेतलेली आहे. त्यानुसार वादी नं. ३ व मयत प्रदिप आण्णा पाटील यांची नोंद ७/१२ पत्रकी करण्यात आली. मयत प्रदिप पाटील यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी नं. ४ ते ६ यांच्या नावाची नोंद दावा मिळकत १(ब) चे ७/१२ पत्रकी झालेली आहे. वादी नं. ३ ते ६ हे दावा मिळकत १(ब) चे कायदेशीर मालक, वहिवाटदार असून ते सदर जमीनीतून ऊस, भुईमुग, गहू इ. पिके घेतात.

५. प्रतिवादी यांचा दावा मिळकतींशी काहीही संबंध नसताना प्रतिवादी नं. १ चे सांगण्यावरुन प्रतिवादी नं. २ व ३ यांनी दि. ०५.११.२०२२ दावा मिळकत

१(अ) मध्ये लावलेली ऊसाची रोपे उपटून काढून सुरुवात केली होती , त्यावेळी वादी नं. १ व २ यांनी प्रतिवादी नं. २ व ३ विरोध केला असता त्यांनी रोपे उपटून टाकली . प्रतिवादी यांनी वादी नं . ३ यांना धमकी दिली . वादी नं. २ यांनी त्याबाबत शिवाजी नगर पोलीस ठाणे, इचलकंरजी येथे एनसी दाखल केली आहे . प्रतिवादी यांनी चिडून दावा मिळकत १(ब) मध्ये दि. १७.११.२०२२ रोजी जबरदस्तीने घुसून त्यामधील ऊस रोपांवर तणनाशकांची फवारणी करुन वादी नं . ३ ते ६ यांच्या ऊस पिकाचे नुकसान केले. वादी नं. ३ ते ६ यांनी समजाविण्याचा प्रत्यन केला पण प्रतिवादी यांनी ऐकले नाही. त्यामुळे वादी नं. २ यांनी त्याबाबत शिवाजी नगर पोलीस ठाणे, इचलकंरजी येथे एनसी दाखल केली आहे . प्रतिवादी नं. २ हया महिला असून , प्रतिवादी नं. १ व २ त्यांना पुढे करुन नाहक त्रास देत आहेत. प्रतिवादी हे दावा मिळकतींमध्ये जबरदस्तीने घुसून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत . प्रतिवादी नं. १ गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. प्रतिवादी हे दावा मिळकती हया बळकावतील अशी रास्त भिती वादी यांना असल्यामुळे यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

६. प्रतिवादी यांनी नि.२० कडे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत १(ब) ही एकत्र कुटूंबात एकत्रात असताना प्रदीप पाटील यांचे नावे घेतलेली आहे याचा अर्थ त्यांच्या स्वकष्ठार्जीत होऊ शकत नाही. वादी यांनी मटेरिअल फॅक्टस् प्लीड न करता कथित पुरावा प्लीड केलेला आहे . आपगोंडा पाटील हे ५० वर्षे जवळजवळ तिळवणी येथे रहात होते. मृत्यू पुर्वी शेवटचे १० ते १२ वर्षे जयसिंगपूर प्रतिवादी यांचे जवळ राहणेस होते व त्यांचा सांभाळ प्रतिवादी यांनी केला आहे.तिळवणी येथे असताना जवळजवळ

१५ वर्षे दररोज प्रतिवादी नं . १ जयसिंगपूर येथुन जावून जेवणाचा डबा सकाळ संध्याकाळचा देत होते.

७. वाई येथील न्यायालयात स.फौ.ख.नं. ८४५/१९९७, ८४६/ १९९७, ८८२/१९९७ यांचा निकाला झालेला आहे . सं.क्रि. के. नं.१७२/२००० मध्ये पांडुरंग विलास शिंगटे, सं.क्रि. के. नं. १७३/२००० मध्ये पिक विजय चव्हाण व सं.क्रि. के. नं., १७४/२००० मध्ये राहुल राजाराम वंजारी हे आरोप आहेत त्यामुळे या केसशी प्रतिवादी नं. १ याचा कसलाही संबंध नाही. प्रतिवादी नं. १ यांना सन २०१२ साली शिक्षा झालेली नव्हती . प्रतिवादी नं. १ यांनी पुणे येथील अनेक लोकांची लाखो रुपयाची फसवणूक केलेली नाही. प्रतिवादी नं. १ विरुध्द प्रकृती रिसॉर्ट लि. कंपनीने खोटा गुन्हा दाखल केलेला होता व त्या मधून प्रतिवादी नं . १यांची निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे . प्रतिवादी नं . १ हे देखील सह मालक असलेने सहमालकाविरुध्द कब्जाला मनाई मिळणेचा दावा केव्हाही चालणेस पात्र नाही.

८. प्रतिवादी नं. १ चे लाभात त्यांचे वडील आपगोंडा शंकर पाटील यांन दि. ३०.०६.२०१८ रोजी लिहून ठेवलेल्या मृत्यूपत्र लिहुन दिलेचा राग मनात धरुन सदरचा दावा केला आहे . प्रतिवादी नं. १ यांचे वडिल आपगोंडा पाटील याचे जयसिंगपूर उदगाव बॅकेचे कर्ज भागवणेसाठी , प्रतिवादी नं. १ स्वतःची तिळवणी येथील ग.नं. २०/१ ची मिळकत ही विक्री केलेली आहे . त्याचा राग मनात धरुन प्रतिवादी नं. १ व खरेदीदार यांचे विरुध्द मा. घुलेसेाा कोर्टात रे.क.नं. १८१/२०२० हा दावा दाखल केलेला आहे. यातुन वादी यांना दावे करण्याची सवय आहे असे दिसुन येते . वादी हे स्वच्छ हाताने कोर्टासमोर आलेले नाहीत. वादी यांनी वस्तूस्थिती लपवून दावा दाखल

केलेला आहे. त्यामुळे तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

९. अर्ज, प्रतिवादी यांचे अर्जास म्हणणे , प्रकरणातील उभय पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्रे पाहिल्यानंतर आणि दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावर मी कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. | सोयीस्करतेची तुला वादीच्या बाजुने आहे असे तो सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३. | मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतो काय ? | नाही. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

१०. प्रस्तूत प्रकरणात वादी यांनी गट नं. १०५ चा ७/१२ उतारा नि. ३/१ येथे, दि. १९.०५.२००० रोजीचे खरेदीपत्र नि. ३/२ येथे, मान्यता पत्र नोंद नं. २०३६ नि. ३/३ येथे, फेरफार क्र. २३३३ चा फेरफार उतारा नि. ३/४ येथे, फेरफार क्र. ३००२ चा फेरफार उतारा नि. ३/५ येथे, फेरफार क्र. ५०१८ चा फेरफार उतारा नि. ३/६ येथे, फेरफार क्र. १०७० चा फेरफार उतारा नि. ३/७ येथे, गट नं. १०४ चा ७/१२ उतारा नि. ३/८ येथे, दि. १०.१२.२००० रोजीचे खरेदीपत्र नि. ३/९येथे, गट नं. ९८ ते १०६ चा सिटी

सर्व्हे नकाशा नि. ३/१० येथे, एन.सी.आर. नं. ६६५/२०२२ नि. ३/११ येथे, एन.सी.आर. नं. ६९३/२०२२ नि. ३/१२ येथे, फेरफार क्र. ४९५६ चा फेरफार उतारा नि. ३/१३ येथे कागदपत्र दाखल आहे. प्रतिवादीतर्फे कोणतेही कादपत्र दाखल करण्यात आलेली नाहीत.

११. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दावा मिळकत १(अ) ही वादी नं. १ व २ यांच्या मालकीची आहे. दावा मिळकत १(ब) ही वादी नं. ३ ते ६ यांच्या मालकीची आहे. दावा मिळकतींमध्ये वादी यांची कब्जे वहिवाट आहे . वादी हे दावा मिळकतींमध्ये ऊस, भुईमुग इ, पिके घेतात. दावा मिळकतींशी प्रतिवादी यांचा काहीही एक संबंध नाही. दि. ०५.११.२०२२ रोजी प्रतिवादी यांनी दावा मिळकत १ (अ) मधील ऊसाची रोपी उपटून बाहेर फेकून दिली होती . त्याबाबत वादी नं. २ यांनी पोलीस स्टेशन येथे एन.सी.आर. नं. ६६५, दि. ०५.११.२०२२ रोजी दाखल केली आहे . प्रतिवादी यांनी चिडून दावा मिळकत १ (ब) मध्ये घूसून त्यामधील ऊस रोपांवर तणनाशकांची फवारणी केली . वादी नं. ३ ते ६ यांनी प्रतिवादी यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण प्रतिवादी हे काहीही एक ऐकुन घेत नव्हते . त्यामुळे वादी नं. ४ यांनी प्रतिवादी यांच विरुध्द पोलीस स्टेशन येथे एन.सी.आर. नं. ६९३,दाखल केली आहे. प्रतिवादी नं. २ ही महिला असल्याचा गैरफायदा घेवूनत्यांना पुढे करुन वादी यांना त्रास देत आहेत. प्रतिवादी नं. १ हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. तो कसल्याही प्रकारे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन दावा मिळकत काढून घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे जर अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. या कथनांच्या आधारे प्रस्तुतचा प्रतिवादी यांच्या विरुध्दचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

१२. प्रतिवादी नं. १ ते ३ तर्फे वकिलांनी असा युक्तीवाद केला की , दावा मिळकती हया एकत्र कुटूंबातून खरेदी केलेल्या आहेत . त्यावर वादी यांना कसलाही हक्क अधिकार राहणार नाही. दावा मिळकत १(ब) ही एकत्र कुटूंब असताना प्रदिप पाटिल यांनी खरेदी केलेली आहे. त्यांची ती स्वकष्ठार्जीत मिळकत नाही. वादी यांनी घटना हया न्यायालयासमोर न आणता पुरावा सादर करुन दावा तयार केला आहे . प्रतिवादी नं. १ गुन्हेगारी प्रवृत्तीचे कधीही नव्हते . प्रतिवादी नं. १ यांच्या वर जे गुन्हे दाखल होते त्या गुन्हयातून प्रतिवादी नं . १ याची निर्दोष मुक्तता झालेली आहे . प्रतिवादी नं. १ यांना कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नाही . प्रतिवादी नं. १ यांनी कोणत्याही व्यक्तीची फसवणूक केलेली नाही . प्रतिवादी नं. १ हे देखील त्यामध्ये सह मालक असलेने सह मालकाविरुध्द कब्जाला मनाई मागणेचा दावा चालणेस पात्र नसतो. प्रतिवादी नं. १ यांच्या वडिलांनी मृत्यूपत्र लिहून दिल्याचा राग मनात धरुन प्रस्तूतचा दावा केला आहे . वादी यांनी इचलकरंजी कोर्टात रे .क.नं. १८१/२०२० हा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द दाखल केला आहे. वादी हे स्वच्छ हातानी आलेले नाहीत. असा युक्तीवाद करुन वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा असा युक्तीवाद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करिता</u>**

१३. सदर तिन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी ते एकत्रीत विचारार्थ घेत आहे . वादी यांच्यातर्फे असे कथन करण्यात आले की, दावा मिळकती हया वादी यांच्या मालकी कब्जे वहिवाटीच्या आहेत. त्याबाबत त्यांनी नि. ३/१ व नि. ३/८ येथे दावा मिळकतींचे ७/१२ पत्रक दाखल

केले आहेत. सदर पत्रकांचे अवलोकन केले असता दावा मिळकती हया वादी यांची असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच वाद मिळकती हया वादी यांच्या कब्जेत आहेत.

१४. सकृतदर्शनी दावा मिळकतींच्या ७ /१२ पत्रकांचे अवलोकन केले असता दावा मिळकत १(अ) ही वादी नं. १ आणि २ यांचे नावे व दावा मिळकत १(ब) ही वादी नं. ३ ते ६ यांच नावे असल्याचे स्पष्ट होत आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे कोणत्याही पक्षकाराने त्यांचे नाते संबंध स्पष्टपणे सांगितलेले नाहीत . वादी व प्रतिवादी त्यांनी त्यांची वंशावळही न्यायाच्या दृष्टीने सादर करणे आवश्यक होते . परंतू तसे करण्यात आलेले नाही . तसेच प्रतिवादी यांनी त्यांचा वादीशी कसा संबंध आहे याबाबत ही काहीही सांगितलेले नाही.

१५. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा कसा संबंध निर्माण होते या बाबीसाठी कोणताही पुरावा प्रथमदर्शनी सादर केलेला नाही . प्रस्तूतचा दावा हा मनाईसाठी आहे हे जरी मान्य असले तरी प्रतिवादी व वादी यांचा कसा संबंध निर्माण होतो याबाबतही कोणतेही स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे . प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की एकत्र कुटूंबात एकत्रात असताना प्रदिप पाटील यांनी जमीन त्यांचे नावे घेतलेली आहे. पण प्रतिवादी आणि प्रदिप पाटील यांचे नातेसंबंध काय याबाबत काहीही स्पष्टता केलेली नाही.

१६. दावा मिळकत १(अ) व १(ब) यांच्या ७/१२ पत्रकांचे अवलोकन केले असता ते वादी यांचे नावे असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे . सबब, प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कसा काय संबंध या बाबत कोणताही पुरावा हा प्रतिवादी

यांच्यातर्फे सादर करण्यात आलेला नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकत १ (अ) मध्ये जावून ऊसाची रोपे काढुन वादी यांचे नुकसान केले होते हे वादी यांनी दाखल केलेल्या एन.सी.आर. नं. ६६५/२०२२ दि. ०५.११.२०२२ वरुन स्पष्ट होत आहे. तसेच दावा मिळकत १(ब) मध्ये प्रतिवादी यांनी ऊस पिकावरऔषध फवारणी करुन पिकांचे नुकसान केले होते हे वादी यांनी दाखल केलेल्या एन .सी.आर. नं. ६६९३/२०२२ दि. १७.११.२०२२ वरुन स्पष्ट होत आहे. त्यामुळे प्रतिवादी हे दावा मिळकतमध्ये जबरदस्तीने घुसून दावा मिळकतीचे अप्रत्यक्षरित्या नुकसान करत आहे हे स्पष्ट होत आहे.

१७. वादी यांचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी दुरान्वयेही हक्कसंबंध नाही आहे. सबब, प्रतिवादी यांनी त्यांचा दावा मिळकतीशी कसा संबंध आहे हे दाखविण्यासाठी प्रथमदर्शनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही अथवा वादी यांनी दावा मिळकती हया कशाप्रकारे फसवून खरेदी केल्या आहेत याबाबत कोणतेही स्पष्टीकरण प्रतिवादी यांच्यातर्फे करण्यात आलेले नाही. प्रतिवादी नं. १ हा गुंड प्रवृत्ती आहे असे वादी यांचे म्हणणे आहे . परंतू वादी यांच्या तोंडी पुराव्या शिवाय कोणताही पुरावा हा प्रथमदर्शनी सादर करण्यात आलेला नाही.

१८. प्रतिवादी यांनी त्यांच्या पुराव्या दाखल पुढील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे. पंजाब उच्च न्यायालय यांचे संत राम नगीन राम वि. दया राम नगीन राम, एआयआर १९६१ पंजाब ५२८ व मुंबई उच्च न्यायालय यांचे प्रकाश एस. अकोटकर व इ. वि. मंसूरखा गुलाबखा व इ. दि. २६ जुलै १९९५. सदर न्याय निर्णयांचे अवलोकन केले असता मा. उच्च न्यायालय यांनी सहभागिदार यांच्या कब्जाला मनाई देता येणार नाही

यासाठी दिलेले आहेत असे प्रथमदर्शनी दिसून येते . मी मा. उच्च न्यायालयांच्या न्यायनिर्णयांचा आदर ठेवतो. परंतू प्रतिवादी यांनी प्रथमदर्शनी दावा मिळकतीमध्ये त्यांची कशी कब्जे वहिवाट आहे याबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच प्रतिवादी यांनी प्रथमदर्शनी वादी यांच्याशी हित संबंध कसे व सहहिस्सेदार कसे आहेत याबाबत ही कोणताही पुरावा सादर केलेला नाही, त्यामुळे सदर न्यायनिर्णय हे प्रस्तूत प्रकरणास लागू पडत नाहीत.

१९. वादी, प्रतिवादीचे दावा मिळकतीमधील असणारे हितसंबंध सिध्द होण्यासाठी दावा गुणदोषावर चालणे व दोन्ही बाजूंचा पुरावा पटलावर येणे गरजेचे आहे. त्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. या प्राथमिक क्षणी वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही कारण दावा मिळकतींमध्ये वादी यांची कब्जे वहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसन होणार नाही . तसेच दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता ही नाही आहे . त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादी मागणी करत असलेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई देणे योग्य ठरणार आहे. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज खर्चासहीत मंजुर करण्यात येतो

२. प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी वादींचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस व उपभोगास हरकत, अडथळा करु नये व

दावा मिळकतींमधील पिकांची नासधूस करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देत आहे.

३. खर्चाबाबतचा आदेश अंतीम आदेशावेळी करण्यात येईल.

SHASHANK SURESH PEDNEKAR
Digitally signed by SHASHANK SURESH PEDNEKAR
Date: 2023.07.20 17:00:54 +0530

इचलकरंजी
दिनांक -१९.०७.२०२३

(एस. एस. पेडणेकर)
६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
इचलकरंजी.